सत्यमेव जयते

**महाराष्ट्र शासन**

**पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य**

**महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१**

क्र. पोमसं /३६/ र. व का.(८३००) शा.नि.-अधिसूचना /०७/२०२५, मुंबई, दि. ई-स्वाक्षरीत नमूद

**संदर्भ :-** महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय, क्र.संकीर्ण ०९२४/८००/प्र.क्र.४६२/पोल-५ब, दि.७ एप्रिल, २०२५

**विषय :-** पोलीस आयुक्त कार्यालय,अमरावती शहर यांच्या आस्थापनेवर पोलीस हवालदार संवर्गात एक अधिसंख्य पद निर्माण करण्याबाबत.
श्री.इसराईल शहा रहेमान शहा,पोलीस हवालदार

******

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय, क्र.संकीर्ण ०९२४/८००/प्र.क्र.४६२/पोल-५ब, दि.७ एप्रिल, २०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५०४०७१२०५४७०९२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी .

Signed by
Pravin Madhukar Shikhare
Date: 08-04-2025 18:25:06

( प्रविण शिखरे )
पोलीस महासंचालक यांचे उप सहायक(र.व.का.),
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,
पोलीस आयुक्त, अमरावती शहर.
कार्यासन अधिकारी, का.क्र.६

प्रत :-
पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक,कार्यालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

2. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय / परिपत्रके “आस्थापना" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर, यांच्या आस्थापनेवर पोलीस हवालदार संवर्गात एक अधिसंख्य पद निर्माण करण्याबाबत...**

**श्री. इसराईल शहा रहेमान शहा, पोलीस हवालदार**

# महाराष्ट्र शासन

## गृह विभाग

**शासन निर्णय क्रमांक संकीर्ण ०९२४/८००/प्र.क्र.४६२/पोल-५ब,**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२.
दिनांक – ७ एप्रिल, २०२५.

**वाचा** :- १) पोलीस महासंचालक यांचे उप सहायक (आस्था २),पोलीस महासंचालक कार्यालय यांचा दिनांक ०६.०९.२०२४ रोजीचा प्रस्ताव.

२) दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम २०(४).

३) अध्यक्ष,वैद्यकीय मंडळ, श्री.वसंतराव नाईक शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,यवतमाळ, यांचे दिनांक २०.०७.२०२३ रोजीचे प्रमाणपत्र.

४) वित्त विभागाच्या उच्चस्तरीय सचिव समितीच्या दि. २९.०१.२०२५ रोजीच्या बैठकीचे दि.०७.०२.२०२५ रोजीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना :**

पोलीस आयुक्त, अमरावती शहर यांच्या आस्थापनेवरील श्री. इसराईल शहा रहेमान शहा, पोलीस हवालदार/१०४३ हे शासन सेवेत दि.०१.०३.१९९३ रोजी रुजू झाले आहेत. श्री.शहा हे पक्षघात या आजारामुळे दिनांक ११.१२.२०१९ पासून रुग्णनिवेदनावर आहेत. श्री.शहा यांना अध्यक्ष, वैद्यकीय मंडळ,श्री.वसंतराव नाईक शासकीय रुग्णालय व महाविद्यालय, यवतमाळ यांच्या दि.२०.०७.२०२३ च्या प्रमाणपत्राव्दारे पुढील सेवेसाठी कायमस्वरुपी अपात्र ठरविण्यात आले आहे. श्री. शहा हे नियतवयोमानानुसार दि.३०.०९.२०३० रोजी सेवानिवृत्त होणार आहेत. श्री. शहा यांना कायमचे अंपगत्व आल्यामुळे, त्यांच्यासाठी अधिसंख्य पद निर्माण करण्यासंदर्भातील प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता.

**शासन निर्णय-:**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ मधील कलम २० (४) मधील तरतूदीनुसार, श्री. इसराईल शहा रहेमान शहा, पोलीस हवालदार, पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर यांच्यासाठी योग्य पद उपलब्ध होत नाही तोपर्यंत किंवा त्यांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत अथवा अन्य कारणांमुळे पद रिक्त होईल यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंत पोलीस हवालदार या संवर्गाचे एक अधिसंख्य पद गृह विभागांतर्गत निर्माण करण्यास उच्चस्तरीय सचिव समितीने दि.२९.०१.२०२५ रोजीच्या बैठकीमध्ये मान्यता दिली आहे.

प्रस्तुत मान्यतेनुसार, श्री. इसराईल शहा रहेमान शहा, पोलीस हवालदार यांचे एस-९ (२६४००-८३६००) या वेतनश्रेणीतील वेतन काढण्यासाठी पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर यांचे अधिनस्त पोलीस हवालदार संवर्गातील एक अधिसंख्य पद दिनांक २४.१२.२०२१ पासून निर्माण करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

२. सदर अधिसंख्य पद पोलीस आयुक्त कार्यालय,अमरावती शहर यांच्या आस्थापनेवर निर्माण करण्यात येत आहे.

३. सदर अधिसंख्य पद हे श्री. शहा यांच्यासाठी योग्य पद उपलब्ध होत नाही तोपर्यंत किंवा त्यांच्या नियत वयोमानानुसार सेवानिवृत्तीच्या दिनांकापर्यंत अथवा अन्य कारणांमुळे पद रिक्त होईल यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंतच्या कालावधीसाठी निर्माण करण्यात येत आहे. त्यानंतर सदर पद आपोआप संपुष्टात येईल.

४. सदर पदाच्या वेतन व भत्त्यावरील खर्च हा " मागणी क्रमांक-बी-१, मुख्यलेखाशीर्ष २०५५-पोलीस उपलेखाशिर्ष-१०८, राज्य मुख्यालय पोलीस(०२) शहर पोलीस(०२)(०१)शहर पोलीस आस्थापना २०५५००९७-०१(वेतन) " या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

५. सदर शासन निर्णय उच्च स्तरीय सचिव समितीच्या दिनांक २९.०१.२०२५ रोजी संपन्न झालेल्या बैठकीतील निर्णयानुसार तसेच वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ८५/ २०२५/ आपुक, दिनांक २७.०३.२०२५ अनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक सांकेतांक क्रमांक २०२५०४०७१२०५४७०९२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

SUGRIV SAMBHAJI DHAPATE

Digitally signed by SUGRIV SAMBHAJI DHAPATE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=HOME DEPARTMENT,
2.5.4.20=d02297f9b5e889636956e39bfae4ea112e908c0e9a7e572d4190f9709a817f51, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=FC102DE27DC1B41E747AC6CBB491C4209459C3CF340720EA98FD1D95B19C9F65, cn=SUGRIV SAMBHAJI DHAPATE
Date: 2025.04.07 12:07:07 +05'30'

**( सुग्रिव धपाटे )**
**सह सचिव,महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

१.पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई,
२.महालेखापाल, (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य मुंबई/ नागपूर.
३.महालेखापाल ( लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य,मुंबई/नागपूर.
४. पोलीस आयुक्त,अमरावती शहर.
५. जिल्हा कोपागार अधिकारी, अमरावती शहर.
६.वित्त विभाग, आ.पु.क. कक्ष मंत्रालय,मुंबई.
७.सामाजिक न्याय व विशेप सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
८.निवडनस्ती, पोल ५-ब, गृह विभाग, मंत्रालय मुंबई-३२.